**प्रतिनियुक्तीचे पद भरण्यासाठी मागणीपत्र**

**नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**जुने सचिवालय जोड इमारत, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.**

**नागरी संरक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत**

गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीडीएम-2022/प्र.क्र.66/विशा-8, दि.28.06.2022 अन्वये रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील नागरी संरक्षण दलाचे कार्यालय सुरु केले आहे. सदर कार्यालयासाठी उपनियंत्रक गट-अ या पदांवर प्रतिनियुक्तीने अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत गृह विभाग शासन पत्र दि.20.02.2023 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन शासन गृह विभाग, मंत्रालय,मुंबई या विभागाच्या अधिपत्याखालील नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अधिनस्त असलेले **नागरी संरक्षण रत्नागिरी व सिंधुदूर्ग** या कार्यालयातील खालील नमूद करण्यांत आलेल्या पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी शासन सेवेतील अधिकारी यांचेकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | गट | पदांची संख्या | पदाची वेतनश्रेणी 7th Pay नुसार |
|---|---|---|---|---|
| 1. | उपनियंत्रक | अ | 1 | S-23 : 67700 - 208700 |
| | एकूण पदे | | 1 | |

2. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी राहील, तदनंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधी अधिकारी यांची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्याच्या संमतीने हा कालावधी जास्तीत जास्त 5 वर्षापर्यंत वाढविता येईल.

3. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

4. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमून्यात टंकलिखित करुन त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत/खाते प्रमुखा मार्फत, संचालक, नागरी संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे **दिनांक 31.10.2023** पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावे.

5. प्रतिनियुक्तीने नियुक्ती घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी-यांनी ते सद्या शासन सेवेत असल्याबाबतचे त्यांच्या कार्यालय प्रमुखाचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

6. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-12), दि.17.12.2016 व समक्रमांक दि.16.02.2018 मधील अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत अर्जांची तपासणी करण्यात येईल.

7. प्रशासकीय विभागानी/संवर्ग नियंत्रक विभागानी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांचे आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधीत अधिकारी यांच्या मागील 5 वर्षाचे गोपनिय अहवालाच्या सत्यप्रतीसह या विभागाकडे कोणत्याही परिस्थीतीत **दि.31.10.2023** पर्यंत पाठवावेत. विहित मूदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकारी यांचा विचार केला जाणार नाही.

8. प्रतिनियुक्तीने नियुक्ती केलेल्या अधिकारी यांना नागरी संरक्षण, रत्नागिरी / सिंधुदूर्ग या कार्यालयातील उपनियंत्रक या पदावर नियुक्ती देण्यात येईल.

9. अंतिम दिनांकास प्राप्त अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र अर्जाबाबत प्रस्ताव गृह विभाग, महाराष्ट्र शासन,विशा-8, मंत्रालय, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील.

-सही-
**संचालक**
**नागरी संरक्षण संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

# विवरणपत्र - ब

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>मुद्दा</th><th>तपशिल / अभिप्राय</th></tr>
<tr><td>1</td><td>अधिकारी/कर्मचा-यांचे नांव</td><td></td></tr>
<tr><td>2</td><td>जन्मदिनांक</td><td></td></tr>
<tr><td>3</td><td>शैक्षणिक अर्हता</td><td></td></tr>
<tr><td>4</td><td>स्थायित्व प्रमाणपत्र</td><td></td></tr>
<tr><td>5</td><td>भ्रमणध्वनी क्रमांक</td><td></td></tr>
<tr><td>6</td><td>मागील 5 वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत)</td><td></td></tr>
<tr><td>7</td><td>मत्ता व दायित्वे सादर केली आहे का?</td><td></td></tr>
<tr><td>8</td><td>50/55 व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का? (लागू असल्यास)</td><td></td></tr>
<tr><td>9</td><td>संबंधित अधिका-याला यापूर्वी प्रतिनियुक्ती दिली असल्यास तपशील (पद व कालावधी) ( प्रतिनियुक्तीचा एकूण कालावधी 10 वर्षापेक्षा जास्त नसावा )</td><td><table>
<tr><td>दिनांक पासून<br>ते<br>दिनांका पर्यंत</td><td rowspan="3">पद / प्रतिनियुक्तीचे ठिकाण</td></tr>
<tr><td></td></tr>
<tr><td></td></tr>
<tr><td colspan="2">एकूण कालावधी</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>10</td><td>मागील प्रतिनियुक्तीवरून परत आल्याच्या दिनांकापासून 3 वर्षे पूर्ण झाली आहेत का?</td><td></td></tr>
<tr><td>11</td><td>संबंधित अधिका-यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे का?</td><td></td></tr>
<tr><td>12</td><td>प्रतिनियुक्तीकरीता निवड झाल्यास विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे.</td><td></td></tr>
</table>

# विवरणपत्र - क

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव व पद | नियमित पदे | वेतनश्रेणी (७th Pay) | पदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | उपनियंत्रक, नागरी संरक्षण, रत्नागिरी / सिंधुदूर्ग कार्यालय. | उपनियंत्रक | S-23 : 67700 - 208700 | ०१ |

# उपनियंत्रक, नागरी संरक्षण, रत्नागिरी / सिंधुदूर्ग यांची कर्तव्य व जबाबदा-या.

१. उपनियंत्रक हे कार्यालय प्रमुख आहेत.

२. कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडणे.

३. मुख्यालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यालयीन कामकाज हाताळणे.

४. नियंत्रकांच्या आदेशानुसार कर्तव्य पार पाडणे.

५. स्थानिक पातळीवर स्वयंसेवकांची उभारणी करुन त्यांना राज्य पातळीवर पुढील प्रशिक्षणासाठी तयार करणे.

६. नियंत्रकांच्या मान्यतेने मानसेवी अधिका-यांच्या नेमणूका करणे व त्यांच्या सभा घेणे.

७. शहराचा आराखडा तयार करणे.

८. जिल्हयांतील औदयोगीक मर्मस्थ घटके स्थापन करणे व त्यांना प्रशिक्षण देणे.

९. वेळोवेळी स्वयंसेवकांमार्फत मॉक ड्रिल घेणे.

१०. औदयोगीक घटकांमध्ये सुध्दा मॉक ड्रिल कवायती घेणे.

११. नागरी संरक्षण वर्धापन दिन, जागतीक नागरी संरक्षण दिन साजरा करणे.

१२. नागरी संरक्षण, कार्यालयामार्फत बसविण्यांत आलेल्या सायरन पहाणी करणे.

१३. पोस्ट वार्डनाची स्थापना करणे व वेळोवळी भेटी देणे.

१४. विभागीय कार्यालयासाठी जागा निश्चित करणे व विभागीय कार्यालयास भेटी देणे.

१५. शासकीय कर्मचा-यांना नागरी संरक्षण, दलाचे प्रशिक्षण देणे.

१६. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थांना प्रशिक्षण देणे.

१७. कार्यालयांतील कर्मचा-यांना देण्यांत आलेले कर्तव्य त्यांच्याकडून करुन घेणे.

१८. नागरी संरक्षण उमेदवारांची भरती करुन त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांच्या क्षेत्रातील मानसेवी अधिका-यांच्या नेमणूक करणे व त्यांना मार्गदर्शन करणे.

१९. नागरी संरक्षण संघटनेतील सर्व अधिकारी व स्वयंसेवकांना आपत्कालिन कर्तव्यासाठी तयार करणे व सुसज्ज ठेवणे, नागरी संरक्षण स्वयंसेवकांना क्रियाशील ठेवण्याची विविध नागरी संरक्षण प्रात्यक्षिके, संचलन, रुट मार्च, रॅलीज, कवायती, मेळावे इत्यादी उपक्रमाची आखणी करणे.

२०. वरिष्ठांनी वेळोवेळी सोपवलेली कामे / कर्तव्ये पार पाडणे.